ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

# मोलकरीण (घरकामगार) कौशल्ये विकास शिक्षणक्रम आणि उपयोजन

* *प्रा. विजयकुमार पाईकराव,*

* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक

**सारांश:**

घरकामगार, मोलकरीण, घरगडी, मोलमजुरी इ. कामे परिस्थितीमुळे करावी लागतात. माणसे अनिच्छेने ती करतात. पोटाची खळगी भरण्यासाठी दुसरा मार्गच उपलब्ध नसल्यामुळे हा कार्यानंद ते करतात. मोलकरणीविषयी समाजात अनेक गैरसमज व पूर्वग्रह आहेत. ते दूर करण्यासाठी घरमालक आणि घरमालकीण ह्यांचे उद्बोधन, प्रबोधन करून त्यांच्यात आदर, आस्था व आपलेपणाची भावना निर्माण व्हावी याकरिता सर्वत्र प्रयत्न होणे गरजेचे आहे.

शासनाने देखील घरेलूकामगार विकास बोर्ड स्थापन केले आहे. त्याकरिता सुलभ सर्वंकष अशी योजना तयार करावी लागेल. ह्यामध्ये त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सुद्धा कार्यात्मक तरतुदींची आवश्यकता आहे.

मोलकरणी व घरगड्यावर विश्वास टाका : मोलकरीण व घरगड्यांनी आपलेपणानं काम करावं अशी आपली इच्छा असते. त्यासाठी आपण मात्र तिच्यावर विश्वास न टाकता पाळत ठेवतो. विश्वासाने विश्वास वाढतो हे साधे तत्त्व आपण सपशेल विसरतो. मालकीणबाई मात्र आपल्या मोलकरणीकडे संशयाने पाळत ठेवतात. त्यांना जगप्रसिद्ध तिरकस शब्दात बोलतात. त्यांच्या कार्यानंदाची सुरुवातच अविश्वासातून होते. तिथे आपुलकीचे आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी ह्या प्रयत्नांना शास्त्री ज्ञानाची जोड देण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने घरकामगार कौशल्ये विकास शिक्षणक्रमाचे तयार केलेले आहे. त्यामुळे समभावाबरोबरच ममभावाच्या संस्काराची चणचण दूर होण्यासाठी हातभार लागेल, असा विश्वास वाटतो.

मोलकरीण विकासाच्या प्रश्नांची लढाई एकाच वेळी अनेक पातळीवर आपणास लढावी लागणार आहे. त्यात १. आर्थिक, २. मानवीय, ३. सांस्कृतिक, ४. अंधश्रद्धा, ५. अविश्वास, ६. पूर्वग्रह, ७. संघटितपणा, ८. हृदयपरिवर्तन, ९. सहानुभूती, १०. शरीरश्रम, ११. प्रतिष्ठा, १२. कुपोषण, १३. आरोग्य, १४. शिक्षण इ.

यासाठी याशिक्षणक्रमात पुढील अभ्यासक्रमाचा समावेश केला आहे. १. घरकामगारांसाठी भाषा संवादकौशल्ये (मराठी, हिंदी, इंग्रजी). २. घरकामगारांसाठी पोषाहार. ३. घरकामगारांसाठी आरोग्यशास्त्र. ४. घरकामगार कौशल्ये विकास. अश्या अभ्याससक्रमासाठी स्वतंत्र सात पाठ्यपुस्तकाची रचना स्वयंअध्ययन सुलभ तयार केली आहे. या शास्त्रीय ज्ञानाच्या सहाय्याने ज्ञानात्मक समाजनिर्मितीची प्रक्रिया खर्या अर्थानी ज्ञानगंगा घरोघरी, यशवाणी *कानोकानी स्वरुपात प्रवाहित होणार आहे. या शिवाय पाठ्यपुस्तकाचे स्वयंअध्ययन संपर्कसत्रातील नीटनेटकेपणाने घरकामगार समृद्ध होतील. घर मालकीण व मोलकरीण*

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

आपलेपणाची भावना निर्माण व्हावी याकरिता सर्वत्र प्रयत्न होणे गरजेचे आहे.

शासनानेदेखील लवकरच मोलकरीण विकास बोर्ड (मंडळ) स्थापन करून त्यांच्या सेवानिवृत्तीचा प्रश्न मार्गी लावला पाहिजे. त्याकरिता सुलभ सर्वंकष अशी योजना तयार करावी लागेल. ह्यामध्ये त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सुद्धा कार्यात्मक तरतुदींची आवश्यकता आहे.

मोलकरणीवर विश्वास टाका : मोलकरीण व घरगड्यांनी आपलेपणानं काम करावं अशी आपली इच्छा असते. त्यासाठी आपण मात्र तिच्यावर विश्वास न टाकता पाळत ठेवतो. विश्वासाने विश्वास वाढतो हे साधे तत्त्व आपण सपशेल विसरतो. मालकीणबाई मात्र आपल्या मोलकरणीकडे संशयाने पाळत ठेवतात. त्यांना जगप्रसिद्ध तिरकस शब्दात बोलतात. त्यांच्या कार्यानंदाची सुरुवातच अविश्वासातून होते. तिथे आपुलकीचे आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी ह्या प्रयत्नांना शास्त्री ज्ञानाची जोड देण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने मोलकरीण विकास शिक्षणक्रमाचे प्रारूप तयार केलेले आहे. त्यामुळे समभावाबरोबरच

ममभावाच्या संस्काराची चणचण दूर होण्यासाठी हातभार लागेल, असा विश्वास वाटतो.

मोलकरीण विकासाच्या प्रश्नांची लढाई एकाच वेळी अनेक पातळीवर आपणास लढावी लागणार आहे. त्यात १. आर्थिक, २. मानवीय, ३. सांस्कृतिक, ४. अंधश्रद्धा, ५. अविश्वास, ६. पूर्वग्रह, ७. संघटितपणा, ८. हृदयपरिवर्तन, ९. सहानुभूती, १०. शरीरश्रम, ११. प्रतिष्ठा, १२. कुपोषण, १३. आरोग्य, १४. शिक्षण इ.

यासाठी याशिक्षणक्रमात पुढील अभ्यासक्रमाचा समावेश केला आहे.

- **EDU 061 घरकामगारांसाठी भाषा संवादकौशल्ये (मराठी, हिंदी, इंग्रजी) (Language communication skill for domestic workers) Marathi, Hindi, English**
- **EDU 062 घरकामगारांसाठी पोषाहार (Healthy food for domestic workers)**
- **EDU 063 घरकामगारांसाठी आरोग्यशास्त्र (Health science for domestic workers)**
- **EDU 064 घरकामगार कौशल्ये विकास (Skill Development for domestic workers).**
- **पूरक अध्ययन साहित्य : EDU 065 : सामान्यज्ञान**

अनेकांच्या मनात मोलकरीण ह्या शब्दाविषयी किंतू असतो परंतु हिच मंडळी आपल्या मोलकरणींच्या हक्कासाठी किंतु पार गुंडाळून ठेवतात. मोलकरीण शब्दाला विरोध करणारांचा हेतू मुळात साफ नसतो हे मात्र नक्की. कार्यकर्त्यांची शक्ती अनावश्यक, अनउपयुक्त मार्गाकडे, शब्दाकडे वळवणे हाच त्या पाठीमागे अनेकांचा उद्देश असतो. मोलकरीण शब्द परफेक्ट आहे. ही छटा

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

दुसऱ्या शब्दात उद्‌त होऊच शकत नाही. त्यामुळे अधिक गुंतागुंत आणि क्लिष्टता निर्माण होईल असे वाटते. घरकामगार, घरेलू कामगार, गृहकाम सहायक-सहायिका, गृहकामगार इ. शब्दातून मोलकरणीची व्यथा-वेदना दिसत नाही. हे शब्द गुळगुळीत वाटतात. तेव्हा शब्द बदलाबदलीपेक्षा त्यांच्या वेदना-व्यथा बदलण्यासाठी आपले सर्वजण प्रयत्नशील होऊयात. ह्याचाच एक कृतिशील मार्ग म्हणजे ज्ञानगंगा घरोघरी. घर मालकीण व मोलकरीण ह्यांच्या दृष्टीत, वृत्तीत आणि प्रवृत्तीत सकारात्मक बदलासाठी हा शिक्षणक्रम दीपस्तंभ ठरेल असा विश्वास वाटतो.

- **घरकामगार मोलकरणीच्याप्रमुख समस्या:-**

**१. विषमतेची:** सामाजिक मानसिकता समाजात गरिबी, विषमता नेहमीच असते. गरिबांना पोटापुरते मिळाले, राहावयास झोपडी मिळाली तरी पुरे आहे. त्यांना आणि त्यांच्या मुलांना शिक्षणाची, उच्च शिक्षणाची गरजच काय? ते शिकले तर, सुखवस्तू झाले तर कष्टाची कामे करायची कोणी? अशी समाजातील उच्च उत्पन्न गटाची विचारसरणी असते. त्यात बुद्धिमत्ता, कौशल्य इ. नैसर्गिकरित्या सर्व समाजात समानपणे पसरलेले असतात आणि त्या गुणांचा विकास करण्याने समाजाचासुद्धा विकास होतो हे मान्य केले जात नाही. उच्चभ्रूमध्येच सौंदर्य, बुद्धिमत्ता, कौशल्य, राज्य, हुकूमत करण्याचे चातुर्य, इत्यादी असतात असे ही मानसिकता मानते.

**२. अविश्वास:** घरकामगार, मोलकरीण, घरगड्यांनी आपलेपणानं आपल्या घरचं काम करावं, अशी मालकिणीची इच्छा असते आणि ही अपेक्षा बाळगणारी मालकीण मात्र मोलकरणीवर पाळत ठेवून तिचं काम न्याहाळत असते. ती चोरी करील, लबाडी करील ही त्यामागची भूमिका. ज्या व्यक्तींवर किंवा माणसावर आपला मुळातच विश्वास नाही. त्यानं विश्वासू नोकरासारखं वागावं अशी अपेक्षा करणं हा वदतोव्याघात आहे. अविश्वासातून विश्वासाचा जन्म कसा होणार? मोलकरीण आणि नोकर यांच्यावर विश्वास ठेवण्याची मालक आणि घरमालकिणीची दानतच उरलेली नाही. ही मोठी समस्या आहे. ज्या संबंधाची व कामाची सुरुवात अविश्वासातून होते तिथे आपुलकीचे आणि विश्वासाचे वातावरणच कसे निर्माण होईल. याचा कधी तरी विचार करावा लागेल. कुठल्यातरी मोलकरणीने चोरी केली म्हणून सर्व मोलकरणींना चोर ठरविणारा हा मालक कोण असावा ? बहुदा हा मालक / मालकीण स्वत:वरूनच दुसऱ्याची पारख करीत असतो. इतरांचे काम करतांना आपण कामचोरपणा करतो म्हणून प्रत्येक माणूसच कामचोर आहे असे त्यांना वाटते.

**३. लोभ आणि हव्यास:** अतिस्वार्थ आणि लोभापायी बहुतांश उच्च उत्पन्न असणारे लोक घरकामगारांना वेतनवाढ किंवा साप्ताहिक सुट्टी देण्याबाबत इच्छुक नसतात हे सत्य आहे. कारखान्यामध्ये श्रमिकांना मोफत बसप्रवास, मनोरंजन इ. दिल्या जातात आणि त्यांची

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

भरपाई वस्तूंची किंमत वाढवतो. आपण सगळे ही वाढीव किंमतही देऊन टाकतो.

४. **गरिबी, अज्ञान, दारिद्र्य:** घरकामगार, गरिबी, अज्ञान व दारिद्र्य ह्यांची अभद्रयुती असल्यामुळे त्यांना बऱ्याच क्लिष्ट अडचणी येतात.

५. **कामाची व स्थळांची विविधता:** अंगमेहनत करणाऱ्या घर कामगारांच्या कामाची परिस्थिती अत्यंत दयनीय, प्रतिकूल आणि अनाकलनीय तसेच वैविध्यपूर्ण आहे. ह्या कामगारांना एकच मालक नसतो. त्यांचे चार-पाच मालक असतात. त्यामुळे कामाचे ठिकाणही वेगवेगळे असतात. प्रत्येक मालकाच्या मानसिकतेवर या घरकामगारांची परिस्थिती अवलंबून असते. मालकाच्या गरजेनुसार कामाची विविधता असते. वेतन, भत्ते, कामाचे तास, कामाचे स्वरूप ह्यांचे नियम नाहीत.

६. **संरक्षण:** बहुतांश घरकामगारांना मालकिणीचे जगप्रसिद्ध तिरकस शब्दातील टोमणे खाली मान घालून ऐकावे लागतात. तसेच प्रसंगी महिला घरकामगारांना पुरुष घरमालकांच्या वासनेला बळी पडावे लागते.

७. **आजार:** भांडी घासण्यासाठी आणि कपडे धुण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या केमिकल्सयुक्त पावडरी व सावण यामुळे त्यांच्या हातापायाला भेगा पडतात. ओलसर जागेत सतत वावर असल्यामुळे चिखल्या होतात. त्याकरिता हातमोजे किंवा मलमपट्टीची सोय घरकामगारांना उपलब्ध करून दिली जात नाही. वातविकार, डोकेदुखी, डोळे, कंबर ह्यांकडे तर ते लक्षच देत नाही.

८. **नैराश्यमय जीवन:** बहुतांश घरकामगार मोलकरीण दलित, आदिवासी, मागासवर्गीय असून त्यात महिलांची संख्या ९८% आहे. त्यात परितक्त्या, घटस्फाटिता, विधवा ह्यांचा समावेश हमखास असतो. तसेच कमी शिक्षण आणि व्यसनी नवरा ह्यामुळे त्यांच्यात कमालीचे नैराश्य आलेले असते. मात्र त्या त्यांच्या मुला-बाळांच्या व कुटुंबीयांच्या भविष्यासाठी सजग आहेत, जागरूक आहेत, शिक्षणाचे महत्त्व पटते पण काय करावे ह्याबाबत मार्गदर्शन कुठे मिळेल ह्याची माहिती नाही.

९. **कर्ज;** घरकामगार मोलकरीण वर वेगवेगळ्या कार्यासाठी कर्ज काढण्याची पाळी येते. स्वयंसाहाय्य बचत गटाची मदत आता ते काही प्रमाणात घेतात पण बहुतांश मोलकरणीकडे हातउसणे कर्जाऊ पैसे घेण्याचे व उधारीवर किराणा घेण्याच्या प्रसंगामुळे सतत त्या कर्जबाजारी असतात. त्यांना बँकेत खाते काढण्यासाठी अनेक अडचणी येतात त्यामुळे बँकेचे कर्ज मिळत नाही.

- **घरकामगार मोलकरणीच्या कामात प्रामुख्याने पुढील कामांचा समावेश होतो**

(१) भांडी घासणे, घासलेली भांडी व्यवस्थित शेल्फवर (मांडणीवर) ठेवणे.

(२) धुणी धुणे, वाळलेल्या कपड्यांच्या घड्या घालणे.

(३) झाइपोछा म्हणजे झाडलोट व जमीन, फरशी पुसणे,

(४) अंगणात सडा-सारवण टाकणे.

(५) दाईचे किंवा आयांचे काम म्हणजे लहान मुलांना व वृद्धांना सांभाळणे.

(६) मुलांना धरून शाळेत व शाळेतून घरी पोहोचविणे.

(७) भाजीपाला व किराणा सामान बाजारातून आणणे.

(८) झाडांना/बागेत पाणी देणे,

(९) दळण निवडणे व चक्कीवरून दळण दळून आणणे.

(१०) धोब्याकडून कपडे आणणे.

(११) कपड्यांना इस्त्री करणे,

(१२) कपाट आवरणे.

(१३) घरातील जाळी, जळमटे काढणे, पंखे पुसणे इ.

(१४) घरातील फर्निचर, टेबल, खुर्च्या, सोफासेट स्वच्छ पुसणे इ.

(१५) मालकिणीच्या घरातील खुल्नी, मांजरी इ. पाळीव प्राण्यांची निगा राखणे, त्यांची घाण काढणे (मलमूत्र इ.).

(१६) नास्ता, चहा, पूर्ण स्वयंपाक किंवा फक्त पोळ्या करणे.

(१७) जेवणाचे टेबल लावणे.

(१८) जेवण वाढणे.

(१९) फोन घेणे व निरोप घेऊन ठेवणे.

(२०) आल्या गेल्याला दार/गेट उघडणे व बंद करणे.

(२१) पाहुण्यांना चहापाणी, नाश्ता, सरबत बनवून देणे.

(२२) आजोबा, आजीबाई ह्यांची सेवाशुश्रूषा करणे.

(२३) कचरा फेकणे.

(२४) मोटार व अन्य वाहने धुणे, पुसणे.

(२५) सुपारी, मसाले, चटण्या, ओल्या डाळी वाटून देणे, फळांचा रस काढून देणे, भाजी चिरून देणे.

(२६) गालीचे, जाजम इ. व्हॅक्यूम क्लिनरने स्वच्छ करणे किंवा झटकून साफ करणे.

(२७) उन्हाळ्यात कुलरमध्ये पाणी भरणे.

(२८) पिण्याचे पाणी भरून ठेवणे.

(२९) फ्रीज स्वच्छ ठेवणे.

(३०) जोडे, चपलांना पॉलिश करणे.

- **घरकामगार मोलकरणीसाठी विकासात्मक उपयोजन**

१. घरकामगार, मोलकरीण व घरगड्यांवर विश्वास टाका.

२. घरगडी, घरकामगार मोलकरीण ह्यांच्यावर संशय, पाळत ठेवू नका.

३. घरकामगारांना तिरकस शब्द, अपमानकारक शब्दात बोलू नका.

४. घरकामगारांच्या विकासाची लढाई एकाच वेळी बहुआयामी दृष्टिकोनातून करावी लागणार आहे.

४.१ मानवीय दृष्टिकोन

४.२ सांस्कृतिक दृष्टिकोन

४.३ सामाजिक दृष्टिकोन

४.४ अंधश्रद्धा व अज्ञान

४.५ अविश्वास

४.६ पूर्वग्रह, संघटितपणा

४.७ व्यसनाधीनता

४.८ हृदयपरिवर्तन

४.९ सहानुभूती

४.१० शरीरश्रम

४.११ प्रतिष्ठा

४.१२ कुपोषण

४.१३ आरोग्य

४.१४ शिक्षण

४.१५ कायदा, इत्यादी

५. घरकामगारांच्या कार्यानंदाची यादी तयार करावी. ती मालक व घरकामगारांनी एकत्रित स्वाक्षऱ्या करून घ्यावी.

६. साप्ताहिक सुट्टी किंवा एक दिवसाचा जादा पगार द्यावा.

७. घरकामगार कायदा बनवून त्यांना कामगार कायद्याप्रमाणे सर्व आरोग्याच्या व अन्य सुविधा द्याव्यात. त्यात निवृत्ती वेतन, भविष्यनिर्वाह निधी, रजा, इ. चा समावेश असावा.

८. आजारपणात वैद्यकीय मदत.

९. स्वत: च्या गावी जाण्यास १५ दिवस रजा.

१०. घरकाम ही अत्यावश्यक सेवा आहे त्यामुळे घरकामगार बोर्डाची सुसूत्रता करावी.

११. त्यांच्या स्वत:च्या शिक्षणाची व पाल्यांच्या शिक्षणाची व्यवस्था विशेषकरून करणे आवश्यक आहे.

यापेक्षाही जास्त काम करणाऱ्या घरकामगारबाईचा दिवस सकाळी पाचपासून ते रात्री दहापर्यंत चालत असतो. यामुळे तिचे शरीर पिळून निघते. मग तिची मुले शाळेत गेली, अभ्यासाला बसली, जेवली, अंघोळ केली का नाही ह्याची भ्रांत तिला राहत नाही.

- **महाराष्ट्रातील घरकामगार मोलकरणीची सद्य:स्थिती**

१. **वयोमर्यादा:** ६०% घरकामगार १५ ते ४० वयोगटातील आहेत ४०% घरकामगार ४० ते ६० वयोगटातील आहेत

२. **वैवाहिक स्थिती:** ७०% महिला विवाहित, १५% अविवाहित कुमारिका, १०% घटस्फोटिता, परितक्त्या, ५% विधवा

३. **कौटुंबिक उत्पन्न:** मासिक ५ ते ७ हजारांपर्यंत = १०% महिला, मासिक ३ ते ५ हजारापर्यंत = ७०% महिला, मासिक ३ हजारापर्यंत = २०% महिला

४. **शिक्षण:** दहावी/बारावीपर्यंत - ११% महिला, दहावीपेक्षा कमी - ७५% महिला, निरक्षर - १४% महिला

५. **पतीचा व्यवसाय:** ७०% विवाहित महिलांच्या बाबतीत पुढीलप्रमाणे त्यांच्या पतीचा व्यवसाय आहे. ३९% महिलेचे पती मोलमजुरी करतात, १०% बेरोजगार, २% शिपाई / वॉचमन, ४०% खाजगी नोकरी, ९% हातगाडी, मातीकाम

- **घरकामगार कौशल्ये विकास शिक्षणक्रम संरचना- अभ्यासक्रम – ४**

**१. EDU 061 घरकामगारांसाठी भाषा: संवादकौशल्ये: मराठी**

१.१ : घरकामांसाठी साक्षरता

१.२ : ओळख मराठी भाषेची

१.३ : घरकामगारांसाठी अंक ओळख आणि **आर्थिक साक्षरता:**

१.४ : घरकामगारांच्या संवादाचे स्वरूप

१.५ : घरकामगारांसाठी सामान्यज्ञान

**१.२ EDU 061 घरकामगारांसाठी भाषा संवादकौशल्ये: हिंदी**

१.२.१ : विषय प्रवेश

१.२.२ : अक्षरज्ञान शब्दपरिचय एवं बोलचाल

१.२.३ : रोज रोज की बोलीभाषा के शब्द

१.२.४ : साधारण व्याकरण

१.२.५ : साधारण हिसाब-किताब

**1.3 EDU 061 Language communication skill for domestic workers : English**

1.3.1 Preparation for Communication

1.3.2 Communication

**२. EDU 062 घरकामगारांसाठी पोषाहार (Healthy food for domestic workers)**

२.१ खानपान आणि आरोग्य

२.२ : पाचनेंद्रियांविषयी काळजी

२.३ : अगदी सहज, सोप्या स्वस्त पाककृती

**३. EDU 063 घरकामगारांसाठी आरोग्यशास्त्र (Health science for domestic workers)**

३.१ : मानवी शरीराची रचना व कार्य

३.२ : सामान्य संसर्गजन्य संक्रमण रोग

३.३ : प्रथमोपचार

३.४ : वैयक्तिक आरोग्य

३.५ : भोवतालाची (पर्यावरणाची) स्वच्छता

३.६ : अपंगत्व-विकलांगता

३.७ : आनुवंशिक रोगाची ओळख

३.८: सिकल सेल रोग

३.९ : नको असलेली गर्भधारणा टाळणे

३.१०: गरोदरपणात घ्यावयाची काळजी

३.११ : पौगंडावस्था १०-१९ वर्षे

**४. EDU 064 घरकामगार कौशल्ये विकास (Skill Development for domestic workers).**

४.१ : घरकामगारांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची गरज, संकल्पना स्पष्टता व महत्त्व

४.२ : गृहस्वच्छता व्यवस्था यांचे महत्त्व कौशल्ये

४.३ : स्वयंपाकघरात काम करणाऱ्यांसाठी लागणारी **कौशल्ये**

४.४ : खाद्ये व पेय सेवा (सर्व्हिस) कौशल्ये

४.५ : लहान मुलांची, वृद्धांची काळजी व देखभाल करण्याचे कौशल्ये

४.६ : घरकामगारांसाठी संवादकौशल्ये

४.७ : बागकाम देखरेख व्यवस्था व व्यवस्थापन कौशल्ये

**५. पूरक अध्ययन साहित्य : EDU 065 : सामान्यज्ञान**

५.१ : भारताची राज्यघटना व संविधान

५.२ : पंचायतराज

५.३ : स्त्रियांसाठी असलेले कायदे

५.४ : राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व उपक्रम

५.५ : माहिती अधिकार

५.६ : बचतीचे मार्ग व अन्य उपयुक्त माहिती

५.७ : नागरिकांसाठी उपयुक्त सुविधा

५.८ : स्त्री उद्धारकांची चरित्र्ये व जीवनकार्ये

- **कालावधी:-** सहा महिने
- **एकूण श्रेयांक:-** १६
- **एकूण अध्ययन तास:-** ३६० ते ५०० घड्याळी तास
- **मूल्यमापन :-** ४०० गुण (८० गुणाचे प्रात्यक्षिक अंतर्गत कार्य स्वाध्याय व ३२० गुणाचे सैद्धांतिक)
- **संपर्कसत्रे :-** ६४ संपर्कसत्र घड्याळी तासिका
- **मध्यम :-** मराठी/ हिंदी व आवश्यकते नुसार इंग्रजी

- **शिक्षणक्रम उपयोजन :-**

७.१ घरकामगार मोलकरणीसाठी उन्नतीचे बहुआयामी विविध मार्ग माहिती होईल.

७.२ मुक्त विद्यापीठाच्या बी.ए./बी.कॉम. प्रथम वर्षास बी.एड. / एम.एड. प्रवेशास प्राधान्य मिळेल.

७.३ महिला व घरकामगारविषयक विविध परीक्षांसाठी उपयुक्त ज्ञानकौशल्ये.

७.४ घरकामगार मोलकरण महिलांना ओळख पत्र प्राप्त होईल.

- **निष्कर्ष:-** कृतस्य वेतनं न अकृतस्य असे कौटिल्यांनी म्हटल्याप्रमाणे ठरलेल्या कामापेक्षा कामगाराने जास्त काम केल्यास त्याला अतिरिक्त दाम मिळाले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, भारताचा औद्योगिक विकास हेच केवळ आमचे ध्येय असून चालणार नाही, तर तो विकास एका इष्ट अशा सामाजिक पातळीवर, जतन करावा लागेल. भारतात अधिकाधिक संपत्ती निर्माण करण्यात आपली सर्व शक्ती खर्च करून नुसते भागणार नाही. सन्मान्य व उमदे जीवन जगण्यासाठी त्या संपत्तीवर सर्व भारतीयांचा हक्क आहे. एवढे मान्य करणेही पुरेसे नाही तर सर्व प्रकारच्या सामाजिक असुरक्षिततेच्या विरोधात त्याला हमी देण्यासाठी मार्ग आणि साधने शोधली पाहिजे. घरकामगार मोलकरणींचे काम ही एक घरगुती व स्वाश्रयी स्वरूपाची सेवा असल्यामुळे तिला त्याच्या उपकराच्या ओझ्याखाली वावरावे लागते. त्या मोलकरणीच्या कामाचे रास्त मोल व्हावयास हवे. तिला प्रतिष्ठा मिळावयास हवी. ह्याकरिता मुक्त व दूरशिक्षणाद्वारे नवीन कौशल्यावर आधारित शिक्षणक्रम सुलभ व व्यवहार्य असा तयार केला आहे. ज्ञानगंगा घरोघरी ह्या ब्रिदवाक्यानुसार घरकामगारांचा विकास व उद्बोधनासाठी वृत्ती व प्रवृत्तीत सकारात्मक बदलासाठी कटिबद्ध होऊन मार्गस्थ होवूयात.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

चरक भिक्कवे चारिकम बहुजन हिताय... बहुजन हिताय ह्या तथागताच्या तत्त्वाप्रमाणे.

- **संदर्भ सूची:-**


(१) कुलकर्णी रूपा (संपा.) घरेलू कामगार विशेषांक : विमोस प्रकाशन, नागपूर

(२) कुलकर्णी रूपा (संपा.) विमोस, रजत जयंती प्रकाशन, नागपूर

(३) घरेलू कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, २००० चा शासन निर्णय.

(४) महाराष्ट्र राज्यातील कामगारांच्या कामाच्या सेवा शर्ती आणि कल्याणकारी योजना २००३

(५) घरकामगार कौशल्येविकास शिक्षणक्रम पाठ्यपुस्तके य.च.म.मु.वि. प्रकाशन, नाशिक.

(६) देसले राजू (संपा.) मोलकरणींचा निर्धार विशेषांक नाशिक.

(७) पाईकराव विजयकुमार घरकामगरांच्या समस्या व विकासात्मक उपाय, (२०१२) य.च.म.मु.वि. प्रकाशन, नाशिक.


*Cite This Article:*

* **प्रा. पाईकराव वि.**, *(2023)*. मोलकरीण (घरकामगार) कौशल्ये विकास शिक्षणक्रम आणि उपयोजन , ***Educreator Research Journal, Volume–X, Issue– II***, *March –April 2023, 236-245.*